शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाबाबत

तहसिलदारांची जबाबदारी.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्र. एलइएन-१०८६/१२८३/सीआर ३९४३/ग-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २०-२-१९८७.

पहा :- १] शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलइएन-२६७८/ सीआर ७८२/२९११५/ग-३, दिनांक ३/१२/१९७९.

२] शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलइएन-१०८२/ ६६०३/ग-३, दिनांक १७/२/१९८२.

३] शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलइएन-१०८२/ ३३५७२/सीआर १९४६/ग-३, दिनांक ४/१०/१९८२.

१९८६-८७ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पिय मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना मा. मंत्री, महसूल यांनी राज्यात शासकीय जमिनीवर यापुढे अतिक्रमणे झाल्यास अशा अतिक्रमणांबाबत तहसिलदारांना जबाबदार धरण्यात येईल असे घोषित केले आहे.

२. या संदर्भात सर्व जिल्हाधिकारी यांना अशी सूचना देण्यात येते की, त्यांनी त्यांच्या क्षेत्रातील सर्व तहसिलदारांना असे आदेश द्यावेत की, त्यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमणे होवू नयेत म्हणून पुरेपुर दक्षता घ्यावी, तसेच जर ती झालीच तर वेळीच नियमानुसार अतिक्रमणे हटविण्यात यावीत. अन्यथा अतिक्रमणाबाबत तहसिलदार यांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल. अतिक्रमणाबाबत दर सहा महिन्यांनी त्या तहसिलमध्ये शासकीय जमीन किती आहे त्यावर किती अतिक्रमणे आहेत, अतिक्रमणामुळे किती क्षेत्र व्यापले आहे व रिकामी जमीन किती आहे याचा अहवाल संबंधीत तहसिलदार यांनी सोबतच्या विवरणपत्रात भरून जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनास सादर करावा.

३. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. शहरी भागात अकृषिक कारणासाठी व ग्रामीण भागात गायरान जमिनीवर कृषिक कारणासाठी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे होतात. ही अतिक्रमणे वेळीच हटविली जात नाहीत याबाबत शासनाने कडक धोरण स्वीकारले असून अशा अतिक्रमणांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने अतिक्रमणाबाबत वेळीच कार्यवाही व्हावी असा शासनाचा उद्देश आहे.

कृ. मा. प.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-

त्याकरिता संबंधित तहसिलदारांनी आवश्यक ती खबरदारी न घेतल्यास त्यांचे विरूध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

४. परिच्छेद २ मध्ये उल्लेख केलेल्या विवरणपत्रातील माहिती कृषिक प्रयोजनासाठी केलेली सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे व अकृषिक प्रयोजनासाठी केलेली सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे अशी निरनिराळी तयार करून पाठवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

क. सु. देशपांडे

[ श्रीमती क. सु. देशपांडे ]
उपसचिव, महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त.

विवरणपत्र [ग्रामीण भागासाठी]

[शहरी भागासाठी]

कालावधी -

महसूल व वन विभाग.

| क्र. | तालुका. | गावाचे नांव. | अतिक्रमीत जमिनीचा सर्व्हे क्र. व क्षेत्र हे. आर. | अतिक्रमणाचा कालावधी. | संपूर्ण जमिनीचे क्षेत्र चौ. मीटर. | अतिक्रमकाचे नांव. | जमिनीवर शेतीसाठी अतिक्रमण केले असल्यास क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| . | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |

| सरकारी जमीन असल्यास ती महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २२ मधील तरतुदीनुसार कोणत्या प्रयोजनासाठी अभिहस्तांकन करण्यात आली आहे. | बांधकामाचे स्वरुप कच्चे / पक्के. | जमीन शासन आदेश ग्रामीण विकास विभाग क्र. व्हीपीएम- १७६९/२४६३/अ-७६/ दिनांक २१. ८. १९७६ व शासन परिपत्रक ग्रा. वि. वि. क्र. व्हीपीएम. १७७९/ २४६३/अ-७६ तेवीस, दिनांक २१. ८. १९७६ मधील आदेशानुसार ग्रामपंचायतीस जमीन निहित झाली आहे का व असल्यास जमिनीच्या नाव नमूना ७/१२ चा उतारा जोडावा. | जमिनीवर बीगर शेतीसाठी अतिक्रमण केले असल्यास चौ. मी. | जमिनीवरील अतिक्रमणे दूर करण्याकरिता केलेल्या कार्यवाहीचा तपशील. | जमिनीसंबंधी प्रकरण न्यायप्रविष्ट आहे का व असल्यास सद्य:स्थिती. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. |